**मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२/०९/२०११ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त.**

| अक्र | संस्था / कार्यालय | विषय | संबंधित कार्यालय | सभेतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष, एम आय डी सी औद्योगिक संघटना, चंद्रपूर | चंद्रपूर येथे उद्योग भवनाचे बांधकाम करणे बाबत | कार्यकारी अभियंता एमआयडीसी, नागपूर | चंद्रपूर येथील प्रस्तावीत उद्योग भवनाच्या सुरक्षा भिंतीचे बांधकाम झाल्याचे कार्यकारी अभियंता, म औ वि म , नागपूर यांनी सभेत सांगितले. सदर कंत्राटदाराला स्ट्रक्चरल डिझाईन देण्यास म औ वि म , नागपूर कडून उशीर झाल्यामुळे कंत्राटदाराने पुढील बांधकाम करणे बंद केले. परंतु सद्य स्थितीत कंत्राटदाराची पूढील बांधकाम करण्या करीता समजूत काढण्यांत आली असून कंत्राटदार उद्योग भवनाचे काम लवकरच सुरु करणार असल्याबाबत व संपूर्ण बांधकाम मार्च २०१२ पर्यंत पूर्ण होईल असे कार्यकारी अभियंता, म औ वि म , नागपूर यांनी सभेला सांगितले असता यावर मा. अध्यक्षांनी एम आय डी सी यांच्या कामकाजावर तीव्र शब्दात नाराजी यक्त करुन आवश्यक समन्वय साधुन सदर काम प्राधान्याने करावे असे निर्देश दिले. |
| २ | अध्यक्ष, एम आय डी सी औद्योगिक संघटना ,चंद्रपूर. | चंद्रपूर फ्लाय ॲश क्लस्टर विकासाबाबत सद्यस्थिती | कार्यकारी अभियंता, एमआयडीसी व प्रादेशिक अधिकारी , नागपूर- | अतिरिक्त चंद्रपूर औद्यागिक क्षेत्रात म औ वि म तर्फे फ्लाय ॲश समुहाच्या सामायीक सुविधा केंद्राकरीता ५ एकरचा भूखंड वाटप करण्यांत आलेला आहे. तसेच सदर भूखंडाच्या शेजारी एकूण ४२ भुखंडाचे सिमांकन करण्यांत आलेले असल्याचे क्षेत्र व्यवस्थापक, म औ वि म चंद्रपूर यांनी सभेत सांगितले. परंतु सदर अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रात मुलभूत सुविधा उपलबध नसल्यामुळे उद्योजक भूखंडाकरीता अर्ज करण्यास उत्सुक नाही. अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रात मुलभूत सुविधा जसे रस्ता, नाल्या बांधकामा करीता १०.६८ कोटी रुपयांचा पाठविलेल्या प्रसतावामध्ये त्रृटी असल्यामुळे तो प्रस्ताव परत आलेला आहे असे कार्यकारी अभियंता , म औ वि म , यांनी सभेला सांगितले. तसेच सुधारीत प्रस्ताव तयार करुन ८ ते १० दिवसात परत पाठविण्यांत येईल असे कार्यकारी अधिकारी म औ वि म यांनी सभेला सांगितले असता मा. अध्यक्षांनी एम आय डी सी च्या प्रत्येक कामाच्या बाबतीत स्वारस्य दाखत नसल्यामुळे नाराजी व्यक्त केली. |
| ३ | जिल्हा औद्योगिक संघटना, चंद्रपूर | वेकोफिचा भूमीगत रिकाम्या खाणी मध्ये बाटम ॲशने भरण्याबाबत | मुख्य महाव्यवस्थापक वेकोफि चंद्रपूर व मुख्य महाव्यवस्थापक, सी टी पी एस चंद्रपूर | वेकोलिच्या भूमीगत रिकाम्या खाणी मध्ये बाटम ॲशने भरण्याबाबत चर्चा झाली वेकोलिच्या अधिका-याने ५० माक्रो ॲशने भरण्याबाबत चंद्रपूर महाऔष्णिक विज निर्मीती केंद्रा कडे अशा प्रकारची राख उपलब्ध असल्यास कामाला सुरुवात करता येईल असे सांगितले. तसेच महाऔष्णिक विज निर्मीती केंद्राच्या अधिका-यांनी अशा प्रकारची राख उलबध आहे असे सांगितले. त्यावर मा अध्यक्षांनी तिव्र नाराजी व्यक्त करुन असे निर्देश दिले की चंद्रपूर महाऔष्णिक विज केंद्र आणि वेस्टर्न कोल्ड फिल्डस् लि.यांनी समन्वय साधून भूमीगत खानी मध्ये बॉटम ॲश भरण्याचे कामास सुरुवात करावी. व केलेल्या कामाचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | चांदा को-ऑप औद्योगिक सहकारी वसाहत चंद्रपूर | अ) बंगाली कॅम्प ते मच्छी-नाला पर्यंत येणा-या मुख्य रस्त्या वरील डावी कडील नाल्याची रुंदी वाढविण्या बाबत<br>ब) वसाहतीतील मूलभुत सोई व सुविधाकडे विशेष लक्ष देण्याबाबत | मुख्याधिकारी - नगर परिषद, चंद्रपूर | चांदा औद्योगिक सहकारी वसाहती मधील मुलभुत सोयी सुविधा बाबत केंद्र शासनाच्या योजने मध्ये प्रस्ताव तयार करुन जिल्हा उद्योग केंद्रास सादर करावा असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले. तसेच सद्यस्थितीत आवश्यक असलेल्या कामाकरीता पंचशताब्दी निमीत्य प्राप्त होणा-या तरतूदी मधून चांदा सहकारी को ऑपरेटीव्ह वसाहत मधील सुविधे करीता प्राधान्य देवून मुख्याधिकारी, नगर परीषद, चंद्रपूर यांनी प्रस्ताव तयार करुन मा जिल्हाधिकारी यांचे कडे पाठवावा असे निर्देश मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेत. |
| ५ | अध्यक्ष, एम आय डी सी इंडस्ट्रीअल असो., चंद्रपूर. | चंद्रपूर औद्योगिक क्षेत्राकरिता नियमित पाणीपुरवठा होणेकरिता रॅडिअल वेल निर्माण करणेबाबत. | कार्यकारी अभियंता, म ओ वि म , नागपूर. | सन २००९-१० मध्ये चंद्रपूर औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योग घटकांना नियमित पाणीपुरवठा न झाल्यामुळे ब-याच उद्योगांना आपले उत्पादन बंद करावे लागले. व नविन येणा-या उद्योजकांची संख्या वाढत असल्यामूळे हि समस्या पून्हा निर्माण होवू नये या करीता वर्धा नदीमध्ये रॅडीअलवेल निर्माण करणे बाबतचा प्रस्ताव तयार करुन वरीष्ठ कार्यालयास पाठविण्यांत येणार आहे असे उप अभियंता एम आय डी सी चंद्रपूर यांनी सभेत सांगितले. मा अध्यक्षांनी असे निर्देश दिले की, सदर काम लवकर होण्याचे दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी एम आय डी सी मुंबई यांना अर्धशासकीय पत्राने विनंती करण्यांत आलेली आहे असे सभेत सांगितले. |
| ६. | राईस मिल असोसिएशन, मुल | राईस मिल उद्योग समुहाकरिता एम आय डी सी मुल येथे प्लॉट उपलब्ध करुन देणेबाबत. | प्रादेशिक अधिकारी, म ओ वि म , नागपूर. | मुल राईस मील यांनी राईसमील समुह विकास करिता एम आय डी सी मूल येथे ५ एकर जागा उपलबध करुन देण्याबाबत सूचना केल्या. परंतू मुल एम आय डी सी मध्ये जागा उपलब्ध नसल्यामूळे ५ एकर जागा उपलब्ध करता येणार नाही असे विभागीय अधिकारी, एम आय डी सी, नागपूर यांनी सभेत सांगितले. त्यावर मा. अध्यक्षांनी सभेमध्ये केंद्र शासनाच्या एमएसई-सीडीपी योजने अंतर्गत राईस मिल समुह प्रस्तावित आहे करिता प्राधान्याने जागा उपलब्ध कशी करुन देता येईल याची प्रामुख्याने विचारणा करुन निर्णय घ्यावा असे प्रादेशिक अधिकारी, नागपूर यांना सुचित केले. |

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानुन मा अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले.

स्वा/-
अध्यक्ष
जिल्हा उद्योग मित्र समिती तथा
जिल्हाधिकारी,चंद्रपूर.

स्वा/-
सदस्य सचिव
जिल्हा उद्योग मित्र समिती तथा महाव्यवस्थपक
जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.

**मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२/०९/२०११ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित जिल्हा उद्योग मित्र समिती सभे उपस्थित असलेल्या सभासदांची यादी**

| अ.क्र. | उपस्थितांचे नांव व पदनाम | कार्यालय / संस्थेचे नांव |
|---|---|---|
| १ | श्री अशोक अनेकर, विभागीय अधिकारी | एम आय डी सी , नागपूर |
| २ | श्री डी बी जांभूळकर, कार्यकारी अभियंता | एम आय डी सी , नागपूर |
| ३ | श्री एम पी पराते, क्षेत्र व्यवस्थापक | एम आय डी सी चंद्रपूर |
| ४ | श्री व भा जयस्वाल,सरकारी कामगार अधि. | सरकारी कामगार कार्या. चंद्रपूर |
| ५ | श्री एच डी कुलकर्णी | एम आय डी सी |
| ६ | श्री प्रविन जानी, अध्यक्ष | जिल्हा औद्योगिक संघटना, चंद्रपूर |
| ७ | श्री मधुसुदन रुंगठा, अध्यक्ष | एम आय डी सी इंडस्ट्रीअल असो. चंद्रपूर |
| ८ | श्री राजेश्वर चिंतावार, अध्यक्ष | चांदा को-ऑप. इंडस्ट्रीअल इस्टेट, मुल रोड, चंद्रपूर. |
| ९ | श्री एम पी भानारकर, सदस्य | सी टी पी एस उर्जानगर, चंद्रपूर |
| १० | श्री एच वाय कुलकर्णी, सदस्य | डी आय ए, चंद्रपूर |
| ११ | श्री पी सी राजू , उपाध्यक्ष | चांदा को-ऑप. इंडस्ट्रीअल इस्टेट, मुल रोड, चंद्रपूर. |
| १२ | श्री डी एस भेयर, सहाय्यक संचालक | रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर |
| १३ | श्री वि प विरुरकर, अग्रणी जिल्हा प्रबंधक | अग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया, चंद्रपूर |
| १४ | श्री एम एस तेलंग | म रा विज वितरण कंपनी लि. चंद्रपूर |
| १५ | सी बी कोहाडे, ग्रामोद्योग अधिकारी | खादी ग्रामोद्योग बोडे, चंद्रपूर |
| १६ | श्री ए एफ शेंडे, अध्यक्ष | ॲग्रो इंडस्ट्रीज असोसिएशन, मुल |
| १७ | श्री व्ही जे बोरीकर | |
| १८ | श्री एम के बंडे , डी व्ही ई ओ | डी ई व्ही ओ, चंद्रपूर |
| १९ | श्री आलम खान , उद्योजक | मल्टी ऑर्गनिक्स, एम आय डी सी चंद्रपूर |
| २० | श्री ए सी सिंग, महाव्यवस्थापक | वेस्टर्न कोल फिल्ड लि ., चंद्रपूर |
| २१ | श्री हमेंद्र बी शिंदे, प्रतिनिधी | वेस्टर्न कोल फिल्ड लि ., चंद्रपूर |
| २२ | श्री पी एस गिरपूंजू, सदस्य | औद्योगिक सुरक्षा व आरोग्य कार्या., चंद्रपूर |
| २३ | श्री एस बुक्कावार , प्रतिनिधी | राईस मिल असोसिएशन, मुल |
| २४ | श्री हिरेन गोगरी | राईस मिल असोसिएशन, मुल |
| २४ | श्री मुकेश राठोड, सचिव | फ्लाय ॲश इंडस्ट्रीज असो., चंद्रपूर |
| २५ | श्री एस रहेमान पटेल, सदस्य | फ्लाय ॲश इंडस्ट्रीज असो., चंद्रपूर |
| २६ | श्री ए बी केदार, | जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, चंद्रपूर |